तीर्थरूप दादा

दारिद्र्य आणि संकटाच्या वादळात
श्रमप्रतिष्ठा व कर्तव्यनिष्ठेचा दिवा
सतत तेवत ठेवलात,
स्वकृतीतून स्वाभिमानाचा संस्कार
माझ्यात रुजविलात,
स्वसंसारात वाळवंट असूनही
माणुसकीचा झरा पाझरत ठेवलात,
स्वतः आजारी असतानाही
मला एम·फिल्·च्या परीक्षेस जायला सांगून
आपण निघून गेलात ··········
हरवल्या पावलांच्या आठव स्मृतींना
ही भावसुमनांजली

अर्पण·

प्रा·डॉ·क·बा·कुंदप,
मराठी विभाग प्रमुख,
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड - 415 124·

## प्र मा ण प त्र

श्री·नवनाथ मारुती वाघमारे यांनी "**पं·भीष्माचार्यांचे पंचवार्तिक : वाङ्मयीन अभ्यास**" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने ही प्रबंधिका त्यांनी स्वतः पूर्ण केली आहे· हा प्रकल्प विद्यापीठाच्या एम्·फिल्· पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे· त्यांचे प्रबंधिकेचे काम पूर्ण आहे व प्रबंधिका सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते·

कराड·

दिनांक :-23/2/९४

(डॉ·क·बा·कुंदप)
मार्गदर्शक

" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद "– कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज

कला, विज्ञान व वाणिज्य ( कनिष्ठ व वरिष्ठ )
विद्यानगर, कराड पीन – ४१५ १२४
जि. सातारा (महाराष्ट्र) पो. बॉ. नं. ३

स्थापना : १९५४

दूरध्वनी : कार्यालय : २३४६
निवास : २७९४

संस्थापक :
पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील
डी. लिट.

प्राचार्य :
ई. जी. निकम,
एम्. ए.

संदर्भ क्र. २३९८/९३-९४

दिनांक : १-२-१९९४

## प्रमाणपत्र

श्री. नवनाथ मारुती वाघमारे, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले हे या महाविद्यालयाच्या सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात एम. फिल. [मराठी] पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थी होते. त्यांनी "पं. भीष्माचार्यांचे पंचवर्तिक : वाङ्मयीन अभ्यास" या विषयावर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. त्यांची प्रबंधिका एम. फिल. परीक्षेसाठी स्वीकारावी अशी मी शिफारस करतो.

[ई. जी. निकम]
प्राचार्य,
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

## प्र ति ज्ञा प त्र

"**पं·भीष्माचार्यांचे पंचवार्तिक : वाङ्मयीन अभ्यास**" या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्·फिल्· या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे· ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही·

**तळमावले**

**दिनांक :-** 23/2/08

**§ प्रा·एन·एम्·वाघमारे §**

**अभ्यासक·**

# भूमिका व ऋणनिर्देश

मराठीची व्याकरणपरंपरा पाहताना प्राचीन काळातील काही महानुभावीय व्याकरणकारांचा उल्लेख केलेला आढळतो, परंतु व्याकरणकार म्हणून त्यांना फारसे महत्त्व दिले गेलेले नाही असे दिसून येते. म्हणून मराठी व्याकरणाच्या महानुभाव काळातील सुरुवातीबद्दल सविस्तर जाणून घेण्याची इच्छा ब-याच दिवसापासून होती. ती इच्छा पूर्ण करण्याची संधी मला एम्.फिल्.मुळे मिळाली. मार्गदर्शक डॉ.कन्हैया कुंदप यांच्याशी चर्चा करून आणि मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) यांच्या सहकार्याने "**पं.भीष्माचार्यांचे पंचवार्तिक : वाङ्मयीन अभ्यास**" हा विषय निश्चित केला.

पं.कवीश्वर व्यास, पं.आनेराज व्यास, पं.भीष्माचार्य व पं.विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर या चार महानुभाव पंथीय साहित्यिकांनी मराठी भाषेचे व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न पूर्वी केलेला आहे. यांच्यापैकी पं.विश्वनाथ हे पं.भीष्माचार्यांनंतरचे सोळाव्या शतकातील होत, तर प.कवीश्वर व्यास व पं.आनेराज व्यास हे पं.भीष्माचार्यांचे समकालीन होत. यांच्यापैकी "व्याकरण" म्हणण्याजोगा ग्रंथ केवळ पं.भीष्माचार्यांचा "पंचवार्तिक" हा आहे. या ग्रंथाचा "मराठी भाषेचे आद्य व्याकरण" या दृष्टीकोणातून सविस्तर परिचय करून देऊन त्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. या ग्रंथात पं.भीष्माचार्यांनी मांडलेल्या स्वतंत्र संकल्पनांचा शोध घेऊन त्यातील कोणकोणत्या संकल्पना आजच्या मराठी व्याकरणात कशा स्वरूपात आलेल्या आहेत, याचे विवेचन करण्याचा प्रयत्न या प्रबंधिकेत केला आहे. याच अनुषंगाने मराठी वाङ्मयाला "पंचवार्तिक" ग्रंथाने दिलेल्या योगदानाचा विचारही प्रस्तुत विवेचनात आला आहे.

संशोधनाच्या विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्त्व देण्यापर्यंत, माझे एम्.फिल्.चे आदरणीय मार्गदर्शक डॉ.कन्हैया कुंदप यांचे मौलिक मार्गदर्शन, मिळालेले सहकार्य व दिलेली प्रेरणा यामुळेच ही प्रबंधिका वेळेत पूर्ण होऊ शकली. त्यांचा सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्भाग्य समजतो.

एम्·फिल्· अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, प्राचार्य पुरूषोत्तम शेठ, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले, प्राचार्य विठ्ठल कोळी, शिक्षण महाविद्यालय, कराड, प्राचार्य आप्पासाहेब पानवळ व प्राचार्य इ·जी·निकम, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड या सर्वांचे मिळालेले सहकार्य आणि प्रेरणा याबद्दलचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहेत·

एम्·फिल्·अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी माझे मित्र प्रा·एन·डी·शेंडगे यांनी, अभ्यासासाठी प्रा·दत्ता कांबळे यांनी व प्रबंधिका त्वरित पूर्ण करण्यासाठी प्रा·यशवंत पाटणे यांनी मला सतत प्रेरणा दिली, प्रा·डी·ए·देसाई यांनी पाठपुरावा केला· तसेच तळमावले महाविद्यालयातील माझ्या सर्व सहकारी प्राध्यापक मित्रांनी मला सतत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात लिखाणाची प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रेरणा दिली· त्यांच्या या शुभेच्छांबद्दल मी कृतज्ञ आहे·

या प्रबंधिकेच्या अभ्यासाच्या वेळीच माझ्या वडिलांच्या आकस्मिक निधनाने आलेल्या उदासीनतेतून सावरून मला प्रबंधिकेच्या हस्तलिखितापर्यंतची मदत करणारी माझी सहचारिणी सौ·सुरेखा हिचा उल्लेखही इथे करणे मला अटळ वाटते·

या शोधनिबंधासाठी आवश्यक असलेले संदर्भ ग्रंथ मिळविण्यासाठी काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले, एल·बी·एस·कॉलेज, सातारा, शिक्षण महाविद्यालय, कराड, शिक्षण महाविद्यालय, उस्मानाबाद आणि सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची मला खूप मदत झाली· या कामी श्री·शिवाजीराव पाटील, श्री·शिवाजीराव जगताप, श्री·नेताजी पाटील, श्री·एस·एन·भोसले आणि श्रीमती आर·एम·कदम या ग्रंथपालांचे बहुमोल सहकार्य मला मिळाले·

या प्रबंधिकेच्या मुद्रणाची व बांधणीची जबाबदारी स्वीकारून सहकार्य करणारे "**रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग सातारा**" चे श्री·मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी श्री·सुशीलकुमार कांबळे, सातारा यांच्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त करतो·

यापुढेही या सर्वांचे असेच सहकार्य मिळत राहील अशी आशा बाळगून सर्वांचा ऋणी राहू इच्छितो·

**प्रा·नवनाथ मारुती वाघमारे**

## अ नु क्र म णि का


पृष्ठांक

**प्रकरण पहिले** — **विषय-प्रवेश** — ०१ – १०

महानुभाव वाङ्मयपरंपरा, महानुभाव साहित्य : प्रेरणा व स्वरूप, महानुभाव पंथाचे साती ग्रंथ, महानुभावीय व्याकरणकार.

**प्रकरण दुसरे** — **पं·भीष्माचार्यांचा परिचय आणि वाङ्मयीन कर्तृत्व** — ११ – २२

"पंचवार्तिक"कार भीष्माचार्य कोण ? - विविध मते, पं·भीष्माचार्यांचे पूर्वचरित्र, वाङ्मयीन कर्तृत्व, पं·भीष्माचार्यांच्या वाङ्मयाचे स्वरूप·

**प्रकरण तिसरे** — **महानुभावीय व्याकरणकार** — २३ – ३९

व्याकरणकार म्हणजे काय ? भाषेला व्याकरणाची आवश्यकता, व्याकरणाचे स्वरूप, मराठी भाषेची व्याकरण परंपरा, महानुभावीय व्याकरणकार - कवीश्वर व्यास, आनेराज बास - लक्षणरत्नाकराचे स्वरूप, पं·भीष्माचार्य - पंचवार्तिक, विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर·

**प्रकरण चौथे** — **पं·भीष्माचार्यांच्या पंचवार्तिकाचा परिचय आणि स्वरूप** — ४० – ६९

पंचवार्तिकाचे स्वरूप -
सूत्रलक्षण - (अ) वचन - सलिंग पदे, केवल पदे, तध्दिती प्रत्यये, संयुक्त पदे, समास - अव्ययीभाव, तत्पुरुष, बहुव्रीही व व्दंव्द, संधी, अलिंग पदे, क्रियापदे·


:: सहा ::

पृष्ठांक

§ब§ वाक्यविचार, §क§ प्रकरणविचार, §ड§ महावाक्य, पेंडीलक्षण·

**सूत्रप्रकृतिलक्षण** - संज्ञासूत्र, परिभाषा सूत्र, विधिसूत्र, नियम सूत्र, अतिदेशसूत्र, अपवादसूत्र, विभाषासूत्र, निपात सूत्र, प्रतिषेध सूत्र व अधिकार सूत्र या सूत्रांची लक्षणे·

**सूत्रकारक लक्षण** - प्रथमा, व्दितिया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी व सप्तमी विभक्ती, विभक्तींचे प्रत्यय व अर्थ·

**सूत्रव्याख्यान लक्षण** - पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रह, वाक्य-योजना, आक्षेप व समाधान - खंडान्वयी व दंडान्वयी वाक्ययोजना·

**सूत्रस्वरूप लक्षण** - प्रतिज्ञा, प्रमाण, दृष्टांत, उपपत्ति, व्यावृत्ति, विषयप्रदान, विशेषप्रबोधक, उत्सर्ग, अपवाद, निषेध, न्याय, विरोधपरिहार, काकु, कक्षा, भावार्थ,प्रकरण, अस्तित्व, निर्देश, निर्णयो, पक्ष, प्रभेद, आशंका, आक्षेप, कार्य, लक्षण, स्वरूप, कारण, हेतु, संबंध, प्रतीति,विशेषण व प्रतिष्ठा·

**प्रकरण पाचवे** — **पंचवार्तिकाने मराठी साहित्यात घातलेली भर-"विशेष"** ७० – ८५

प्राचीन मराठीचा संपन्न इतिहास, महानुभावांनी जनभाषेचा केलेला स्वीकार, विविध वाङ्मयप्रकारांची निर्मिती, मराठी व्याकरणाचे मूळ महानुभावी वाङ्मयात, पंचवार्तिक : मराठी वाङ्मयाला लाभलेले वरदान, महानुभावी गद्य संस्कृत प्रवृत्तीचे, पंचवार्तिकातील पुरुष, समास व संधीविचार, वाक्यविचार, विभक्तीविचार, शब्दांच्या जाती, अव्यय विचार, शब्दविचार, शब्दरूपविचार, "अल्पाक्षर"प्रवृत्ती, सामान्यरूप,

वाक्प्रचार व म्हणी, छंदविचार, विरामचिन्हांचा वापर, पंचवार्तिकाचे इतर विशेष, पंचवार्तिकावरील टीका, गद्यलेखनावर प्रभाव, पंचवार्तिक : आद्य मराठी व्याकरण, पंचवार्तिक व आजचे मराठी व्याकरण·

प्रकरण सहावे — उपसंहार — ८६ – ९१

परिशिष्टे — ९२ – १२६

१. महानुभावीय व्याकरणकारांची व्याकरणसूची

२. पं·भीष्माचार्यांचे लेखन

३. पं·भीष्माचार्यांच्या पोथीची सकळ लिपी-छायाप्रत
पं. न्यायबिराज शास्त्री महानुभाव, संवत्सर, यांच्या सौजन्याने.

४. वाक्म दिगमाची गोष्ट

५. पं·भीष्माचार्यांचे पंचवार्तिक

६. संदर्भ ग्रंथ सूची·